दिनांक - 14/08/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.62

विषय- नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाकडून दिव्यांग व्यक्तींना राखीव ठेवण्यात येणारा 5 टक्के निधी खर्च करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभागप्रमुख यांची दि.14/08/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.संकिर्ण/2015/प्र.क्र.118/नवि-20, मंत्रालय, मुंबई दि.28/10/2015 अन्वये दिव्यांगासाठी रक्कम खर्च करणेबाबत मार्गदर्शक सुचना देणेत आल्या आहेत. विटा नगरपरिषदेच्या सन 2023-2024 आर्थिक वर्षात अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद केली आहे. सन 2023-24 च्या आर्थिक वर्षात दिव्यांग नागरीकांना पेपर प्रसिध्दीद्वारे जाहीर आवाहन करुन त्यांचे मागणी अर्ज मागविणे तसेच मंजूर निधी दिव्यांग नागरीकांच्या उदरनिर्वाहकरीता मागणी अर्जानुसार त्यांच्या बँक खात्यात NEFT/RTGS द्वारे प्रती लाभार्थी र.रु.4500/- प्रमाणे जमा करणेस मंजुरी देणेत येत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ. विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा